वेतनावरील खर्च नियंत्रित करणे

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४१ /अर्थ-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१७

**वाचा -**

**१. शासन निर्णय , वित्त विभाग क्रमां क : संकीर्ण २०१५ /प्र.क्र. ४१ /अर्थ-१ दि.०२.०६.२०१५**
**२. शासन निर्णय , वित्त विभाग क्रमांक : संकीर्ण २०१५ /प्र.क्र. ४१ /अर्थ-१ दि.२३.०९.२०१५**
**३. शासन निर्णय , वित्त विभाग क्रमांक : संकीर्ण २०१५ /प्र.क्र. ४१ /अर्थ-१ दि.१७.११.२०१५**

**प्रस्तावना -**

शासन निर्णय , वित्त विभाग क्रमांक : संकीर्ण २०१५/प्र.क्र. ४१ /अर्थ-१दि.०२.०६.२०१५ अन्वये, वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याच्या अनुषंगाने, पद निर्मिती व रिक्त पदे भरण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. या शासन निर्णयामध्ये दि.२३.०९.२०१५ व दि.१७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. तथापि, या शासन निर्णयामध्ये, वैद्यकीय शिक्षण विभागातील शासकीय दंत महाविद्यालयातील पदांच्या अनुषंगाने काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**शासन निर्णय -**

अत्यावश्यक सेवा म्हणून शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स, तसेच, मेडीकल कोंसिल आफ इंडीया ( MCI )च्या मानकानुसार निश्चित केलेली पदसंख्या विचारात घेऊन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील अध्यापक वर्ग तसेच, रुग्णसेवेशी संबंधीत कर्मचारी (पॅरामेडिकल स्टाफ) यांना संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये, पदभरतीच्या निर्बंधातून वगळण्यात आले आहे. आता त्याच धर्तीवर शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील डॉक्टर्स, अध्यापक वर्ग तसेच, रुग्णसेवेशी संबंधित कर्मचारी (पॅरामेडिकल स्टाफ) यांना पदभरतीच्या निर्बंधातून वगळण्यात येत असून, आता त्यांना पद भरती बाबतचे प्रस्ताव अप्पर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग यांच्या समितीपुढे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. त्याचप्रमाणे या संवर्गातील रिक्त पदांच्या ७५ टक्के मर्यादेत सदर पदांच्या सेवा प्रवेश नियमातील भरती प्रक्रियेचे पालन करुन पदे भरण्याची मुभा राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११४१५२०२६६६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yashwant Dattatraya Deshkar

Digitally signed by Yashwant Dattatraya Deshkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a5225b73692fe5cc84da9c6e5a81f64b5ea3b3480f6bc59563e396367311f8, cn=Yashwant Dattatraya Deshkar
Date: 2017.11.14 15:24:27 +05'30'

**(य.द.देशकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

३. सर्व विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. सर्व सहसचिव/उपसचिव,वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
६. मंत्रालयाच्या सर्व विभागाखाली विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख.
७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
११. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
१२. परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११०००१.
१४. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद.
१५. सर्व विभागीय आयुक्त.
१६. सर्व जिल्हाधिकारी.
१७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१८. सर्व जिल्हा परिषदाचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मुंबई.
२०. प्रधान महालेखापाल-१(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
२१. प्रधान महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
२२. महालेखापाल-२(लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
२३. महालेखापाल-२(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
२४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५. संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२६. सह संचालक (सुधारणा), लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
२७. सह संचालक, लेखा व कोषागारे, नवी मुंबई / पुणे / नाशिक / औरगांबाद / नागपूर / अमरावती.
२८. सह संचालक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती.
२९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
३१. सर्व उप कोषागार अधिकारी.
३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३३. सर्व लेखाधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.
३४. सहकार व वस्त्रोद्योग विभाग (कार्या हाऊसिंग सेल १९ सी),मंत्रालय, मुंबई.
३५. सर्व राजकीय पक्षांची कार्यालये
३६. वित्त विभागातील सर्व कार्यासने.